महाराष्ट्र शासन (कारागृह विभाग)
कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर), कोल्हापूर
फोन नं.0231-250315
ई-मेल आयडी : kdpcity@gmail.com
www.mahaprisons.gov.in

## ई-दरपत्रक निविदा जाहिरात

कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर) कोल्हापूर या कारागृहात बंदीस्त असलेल्या बंद्यांना उपहारगृहामार्फत दि.01/04/2021 ते दि.30/6/2021 या कालावधीकरिता खाद्योपयोगी व दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंची खरेदी ई-दरपत्रक पध्दतीने करावयाची आहे. ई-दरपत्रकासाठी **तांत्रिक अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.31.03.2021 रोजी सायं. 05.30 पर्यंत राहील व व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) दि.01.04.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता पर्यंत कारागृहाचे मुख्यप्रवेशद्वारातील उपहारगृह निविदा दरपत्रके पेटीमध्ये सिलबंद पाकीटात बंद करून टाकावेत व त्याच दिवशी सकाळी 11:30 वा. अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर) कोल्हापूर यांचे समक्ष समितीसमोर दरपत्रके पेटी उघडण्यात येईल.**

## निविदेबाबत अटी व शर्ती

### (ई-दरपत्रक निविदा प्रक्रियेत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील)

| | |
|---|---|
| 1 | पुरवठादार यांची संस्था ही नोंदणीकृत असावी.<br>अ) दुकान अधिनियमानुसार नोंदणीकृत/कंपनी ॲक्ट व भागिदारी संस्थेने नोंदणीकृत असावी.<br>ब) संबंधित संस्थेच्या मालकाचे/भागीदारांचे पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावी. |
| 2 | पुरवठाधारक संस्थेकडे संस्थेच्या नावाचे पॅनकार्ड व जीएसटी नोंदणी क्रमांक असावा. |
| 3 | वस्तूंचा पुरवठा हा पुरवठादाराने कारागृहाच्या मेनगेटपर्यंत करणे गरजेचे आहे. |
| 4 | पुरवठादारानां वस्तूंचा पुरवठ्यासाठी कोणतेही भाडे दिले जाणार नाही. |
| 5 | पुरवठादाराकडून प्राप्त दर हे सर्व करांसह असावेत. |
| 6 | पुरवठादारांनी ई-दरपत्रक प्रक्रियेसाठी तांत्रिक अर्ज व व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) असे दोन प्रकारचे अर्ज करणे गरजेचे आहे. |
| 7 | व्यावसायिक दरपत्रकाचा नमुना कारागृहाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्यावरुन डाऊनलोड करण्यात यावा. |
| 8 | ई-मेल वर तांत्रिक अर्ज पाठविण्याची मुदत दि.26/03/2021 ते दि.31/03/2021 रोजी सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत आहे. **दरपत्रक दिनांक 01/04/2021 रोजी सकाळी 11.30 वाजता अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर) कोल्हापूर यांचेसमक्ष व समिती समक्ष उघडण्यात येईल.** |
| 9 | तांत्रिक अर्ज हा जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिक्षक कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर) कोल्हापूर यांचे ई-मेल आयडीवर (kdpcity@gmail.com) विहीत मुदतीत पाठविणे गरजेचे आहे. तर व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) हे संबंधित पुरवठादाराने ई-दरपत्रक प्रक्रिया उघडण्याच्या दिवशी स्वत: सिलबंद पाकिटात घेऊन येणे आवश्यक आहे. |
| 10 | पुरवठादारांनी अधीक्षकांच्या ई-मेल आयडीवर (kdpcity@gmail.com) तांत्रिक अर्ज पाठविताना त्याची एक प्रत मा. कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-6 यांचे ई-मेल आयडीवर (digwrpune@gmail.com) पाठवणे बंधनकारक आहे. |
| 11 | कारागृह अधीक्षकांच्या ई-मेल आयडीवर जरी पुरवठादाराचा तांत्रिक अर्ज दिसून आला नाही. मात्र मा. कारागृह उपमहानिरीक्षक, प.वि., येरवडा, पुणे यांच्या ई-मेल आयडीवर (digwrpune@gmail.com) अर्ज विहीत वेळेत मिळाला असेल तर तो ग्राह्य धरण्यात येईल. |
| 12 | दरपत्रकाचा नमुना वस्तूंच्या नावासह देण्यात आला असून पुरवठादारांनी सदर नमुना डाऊनलोड करुन नमुन्यात दर नमुद करावेत. |
| 13 | एकदा तांत्रिक ई-दरपत्रकाचा अर्ज पाठविल्यानंतर त्याच पुरवठादाराने दुसऱ्यांदा तांत्रिक ई-दरपत्रकाचा अर्ज पाठविल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही. |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR •

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| 14 | तांत्रिक अर्ज करताना पुरवठादाराने पुरवठादाराकडे कारागृह प्रशासनाने मागणी केलेली कागदपत्रे स्कॅन करुन त्यांच्या अधिकृत लेटरहेडवरील अर्जासह कारागृह अधिक्षकांच्या ई-मेलवर पाठविणे गरजेचे आहे. |
| 15 | सदर अर्जामध्ये पुरवठादार स्वत: उपस्थित राहणार आहे किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहणार हे नावानिशी व ओळखपत्राच्या प्रतिसह ई-मेलव्दारे कळविणे बंधनकारक आहे. |
| 16 | पुरवठादाराने ज्या ई-मेल आयडीवरुन ई-दरपत्रकाबाबत तांत्रिक अर्ज केला आहे, त्याच ई-मेल आयडीवरुन झालेला पत्रव्यवहार ग्राह्य धरण्यात येईल. |
| 17 | तांत्रिक अर्ज भरण्याची अंतिम तारखेनंतर येणारा कुठलाही तांत्रिक अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही. |
| 18 | **पुरवठादाराने बयाणा रक्कम रुपये 5,000/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर) कोल्हापूर यांचे स्टेट बँक, दसरा चौक शाखा, कोल्हापूर (IFSC No. SBIN0000413) खाते क्रमांक 33527306185 वर RTGS व्दारे भरणे आवश्यक आहे. तांत्रिक अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच बयाणा रक्कम भरल्याची नोंद तांत्रिक अर्जासोबत मेल करणे गरजेचे आहे.** |
| 19 | **व्यावसायीक दरपत्रक निविदेमध्ये वस्तूंचे दर दिलेल्या परिमाणानुसार खाडाखोड न करता सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे. पुरवठादारांनी व्यावसायीक दरपत्रके पुर्णपणे भरुन प्रत्येक पानांवर सही व शिक्का असावा अन्यथा दरपत्रके ग्राह्य धरले जाणार नाही.** |
| 20 | व्यावसायीक दरपत्रकामध्ये वस्तूंसमोर नमूद केलेले दर ग्राह्य धरण्यात येईल. यादीमध्ये नमूद केलेल्या दरास वस्तू पुरवठा करण्यास पुरवठादार तयार नसल्यास अशा संस्थेस अपात्र करण्यात येईल. **पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंच्या ब्रँन्डवर उत्पादन दिनांक व मुदतबाह्य दिनांक इत्यादी बाबी नमुद असणे आवश्यक आहे.** |
| 21 | **व्यावसायीक दरपत्रकात जाहिरातीमध्ये नमुद वस्तूंच्या ब्रॅण्डच्या व्यतिरिक्त इतर ब्रॅण्डची परस्पर नावे लिहू नयेत. तसे आढळल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही. सदर संस्थेस अपात्र करण्यात येईल.** |
| 22 | व्यावसायीक अर्ज (दरपत्रके) उघडण्याची दिवशी संबंधित व्यापारी अथवा त्यांचा प्रतिनिधी दिलेल्या वेळेनुसार कारागृहाच्या कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. |
| 23 | जर एखादा व्यापारी किंवा त्यांचा प्रतिनिधी हा उपस्थित राहणार नसेल तर तसे पत्राव्दारे किंवा दुरध्वनीव्दारे कारागृहास कळविण्यात यावे. |
| 24 | ई-मेल व्दारे स्कॅन करुन पाठविण्यात आलेले सर्व कागदपत्रे पात्र निविदा उघडतेवेळी तपासणी करणेसाठी सोबत बाळगणे आवश्यक आहे. |
| 25 | फक्त तांत्रिक अर्ज पात्र ठरलेल्या पुरवठादारांचीच दरपत्रके सर्वांसमक्ष स्विकारली जातील. तांत्रिक अर्ज उघडण्याच्या दिवशीच संबंधित पुरवठादार/प्रतिनिधी त्यांचे वस्तूंचे दरपत्रक सिलबंद पाकिटात घेऊन स्वत: उपस्थित राहतील. दरपत्रके पुरवठाधारकाने स्वत:च्या संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवर देणे गरजेचे आहे. समिती सदस्यांपुढे ती उघडण्यात येतील. सदर दरपत्रकातील दरांचे जाहीर वाचन करण्यात येईल. |
| 26 | दरपत्रक निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारागृह अधीक्षक यांच्या अधिकार कक्षेत राहील. |
| 27 | ज्या संस्थेचे सर्वात कमी दर असतील त्यांनी या कार्यालयास संपर्क साधुन पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंबाबत 10 दिवसाच्या आत स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. |
| 28 | पात्र झालेल्या पुरवठादाराचे पुरवठ्याचे अंतिम आदेश मिळाल्यानंतर सात दिवसांचे आत त्याला मंजूर झालेल्या वस्तूंच्या मागील 3 महिन्यांच्या पुरवठ्याच्या एकूण देयकाच्या 3 टक्के इतकी सुरक्षा अनामत म्हणून या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. सुरक्षा अनामत रक्कम ही धनादेशाव्दारे किंवा डिमांड ड्राफ्टव्दारेच स्विकारण्यात येईल. |
| 29 | अंतिम आदेश व वस्तूंचे मागणीपत्रक मिळाल्यानंतर पुरवठादारास 48 तासांच्या आत वस्तूंचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. विहीत वेळेत पुरवठा न झाल्यास कारागृह तातडीची बाब म्हणून स्थानिक बाजारातून दरपत्रक मागवून संबंधीत वस्तूंची खरेदी करेल. कारागृहास स्थानिक बाजारातून निविदेतल्या दराहून जास्त दराने खरेदी करावी लागल्यास सदरील दरातील फरक हा संबंधित पुरवठादाराच्या देयकातून वसुल केला जाईल. |
| 30 | खाद्यवस्तु हलक्या दर्जाच्या व खाण्यास अयोग्य असल्यास त्या नाकारण्याचे अधिकार कारागृह अधीक्षक यांना आहेत. नाकारलेल्या वस्तू बदलून देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील व पुरवठादाराचे नुकसान झाल्यास कारागृह प्रशासन जबाबदार राहणार नाही. खाद्योपयोगी वस्तू भेसळयुक्त असल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |
| 31 | पुरवठादारास वस्तूंच्या एम.आर.पी. पेक्षा जास्त किंमत दिली जाणार नाही. |
| 32 | **निविदेत भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना निविदेत नमुद सर्व वस्तूंचे दर भरणे बंधनकारक असेल.** |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR •

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| 33 | साखर, शेंगदाणे, खारीक, भाजके चने इ. वस्तुंचा पुरवठा करताना सदरच्या वस्तु 1 किलो, 500 ग्रॅम व 250 ग्रॅम च्या पॅकींगमध्ये असावेत. |
| 34 | वस्तूंचे उत्पादक अथवा वस्तूंचे अधिकृत वितरक (कंपनीचे डिलर) यांना फक्त ते उत्पादक/डिलर असलेल्या वस्तूंचेच दर भरण्याची मुभा असेल मात्र अधिकृत विक्रेते (कंपनीचे रिटेलर) यांना ही सवलत मिळणार नाही. |
| 35 | पुरवठादारांना बिलाची रक्कम ही वस्तूंची विक्री झाल्यावर अदा करण्यात येईल. तसेच पुरवठादारांना बिलाची रक्कम धनादेशाव्दारे अदा करण्यात येईल. |
| 36 | पुरवठादाराला ISI/AGMARK/FSSAI मार्क असलेल्या व चांगल्या दर्जेच्या वस्तूंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील |
| 37 | एखाद्या वस्तूवर कंपनीतर्फे एखादी वस्तू फ्री असेल तर अशा फ्री असलेल्या वस्तूंचा देखील पुरवठा करण्यात यावा. |
| 38 | बंद्यांच्या मागणीनुसार वस्तू कमी किंवा जास्त खरेदी करण्याचा किंवा अजिबात न खरेदी करण्याचा हक्क या कार्यालयाने राखुन ठेवलेला असुन त्यामध्ये पुरवठादारास कोणताही दावा सांगता येणार नाही. |
| 39 | काही वस्तू या विशेष सणालाच विक्री केल्या जातात. त्यामुळे सदरील वस्तू नियमित न खरेदी काही विशेष सणालाच बंद्यांच्या मागणीनुसार वस्तूंची खरेदी करण्यात येईल. |
| 40 | प्राप्त झालेल्या निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार निविदा समिती यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहेत. |
| 41 | सदरची ई-दरपत्रक निविदा दि. 01/04/2021 ते दि.30/6/2021 या तीन महिन्याचे कालावधीकरिता वैध राहिल याची नोंद घ्यावी. |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR •

( विवेक व. झेंडे )
प्र.अधीक्षक
कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर)
बिंदूचौक , कोल्हापूर.

Scanned with CamScanner

# तांत्रिक बाबी

**निविदेमध्ये भाग घेणाऱ्या संस्थांनी अधिकृत लेटरहेडवरील अर्जासोबत खालील कागदपत्रे स्कॅन करुन PDF मध्ये फाईल निविदाधारकांनी त्यांच्या ई-मेल आयडीवरुन या कार्यालयाच्या ई-मेल** kdpcity@gmail.com **या ईमेल वर पाठविणे आवश्यक आहे.**

1) पुरवठादाराने संस्थेचा नोंदणी क्रमांक, नोंदणीकृत परवाना, शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र चालू वर्षाचे नुतनीकरण प्रमाणपत्र. सहकारी संस्था असल्यास Bye-laws ची प्रत जोडणे आवश्यक आहे. व्यापारी घटक असल्यास शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र (दुकान नोंदणी प्रमाणपत्र) अद्यावत असणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी शॉप ॲक्ट नाही त्या गावातील ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
2) बयाणा रक्कम भरलेबाबतची पावती अर्जासोबत संस्थेच्या लेटरपॅडवर स्कॅन करुन सादर करावी.
3) पुरवठादाराने जी. एस. टी. नोंद असलेले प्रमाणपत्र व जी. एस. टी. भरल्याची पावती ( सन 2020-21) निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.
4) अन्न व औषध प्रशासन विभाग यांचे अद्ययावत खाद्यपदार्थ विक्री व वाहतूक परवाना (FSSAI Certificate)
5) पुरवठादाराने मागील वर्षातील आयकर रिटर्न भरल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आयकर नोंदणीबाबतचे क्रमांक दर्शविणारे साक्षांकित प्रमाणपत्र (पॅनकार्ड) सादर करणे आवश्यक आहे. किंवा आयकर भरण्यास सुट असल्यास तसे आयकर विभागाचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
6) पुरवठादाराने मागील वर्षाचे (2018-19) ताळेबंद (Balance Sheet) व Chartered Accountant यांनी प्रमाणित केलेल्या मागील वर्षाचे (2018-19) नफा व तोटा (Profit & Loss A/c) लेखे सादर करणे आवश्यक आहे.
7) वरील सर्व आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास निविदा अपात्र ठरविण्याचा अधिकार खरेदी समितीला राहिल.

SUPERINTENDENT SUB JAIL KOLHAPUR

( विवेक व. झेंडे )
प्र. अधीक्षक
कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर)
बिंदूचौक, कोल्हापूर .

Scanned with CamScanner

**कोल्हापूर जिल्हा कारागृह (शहर)**

**उपहारगृह विभाग दरपत्रक**

**(A) जनरल खाद्योपयोगी व इतर वस्तू**

| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
|---|---|---|---|
| १ | साखर | १ किलो | |
| २ | मिठ | १ किलो | |
| ३ | काजू | १०० ग्रॅम | |
| ४ | बदाम | १०० ग्रॅम | |
| ५ | मनुके | १०० ग्रॅम | |
| ६ | पिस्ता | १०० ग्रॅम | |
| ७ | खारीक | १ किलो | |
| ८ | शेंगदाणे | १ किलो | |
| ९ | गुळ | १ किलो | |
| १० | आंबा लोणचे ब्रॅडेड कंपनीचे २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ११ | मिरची लोणचे ब्रॅडेड कंपनीचे २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १२ | गोड लिबु लोणचे ब्रॅडेड कंपनीचे २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १३ | तिखट लिंबू लोणचे ब्रॅडेड कंपनीचे २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १४ | कांदा लसून चटणी २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १५ | मिरची ठेचा लाल/हिरवा २०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १६ | शेंगदाणा चटणी ब्रॅडेड कंपनीचे १०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १७ | खोबरा लसून चटणी ब्रॅडेड कंपनीचे १०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| १८ | वनस्पती तूप | १ किलो | |
| १९ | खजूर | १ किलो | |
| २० | मिरची पावडर | १ किलो | |
| २१ | दालचिनी | १ किलो | |
| २२ | लवंग | १ किलो | |
| २३ | जिरे | १ किलो | |
| २४ | तेजपत्ता | १ किलो | |
| २५ | काळी मिरी | १ किलो | |
| २६ | हिरवी विलची | १ किलो | |
| २७ | खोबरा किस | १ किलो | |
| २८ | मसाला वेलची | १ किलो | |
| २९ | बदाम फुल | १ किलो | |
| ३० | जायफळ | १ नग | |
| ३१ | चारोळे | १ किलो | |
| ३२ | भाजकी शेवई | १ किलो | |
| ३३ | एव्हरेस्ट चिकन मसाला | १ किलो | |
| ३४ | एव्हरेस्ट गरम मसाला | १ किलो | |
| ३५ | हळद पावडर | १ किलो | |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR

Scanned with CamScanner

| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
|---|---|---|---|
| ३६ | धना पावडर | १ किलो | |
| ३७ | मिक्स खडा मसाला | १ किलो | |
| ३८ | बेसन पिठ | १ किलो | |
| ३९ | बटाटा | १ किलो | |
| ४० | कांदा | १ किलो | |
| ४१ | लसून | १ किलो | |
| ४२ | कोथंबीर | १ पेंडी | |
| ४३ | चवळी | १ किलो | |
| ४४ | आल्ले | १ किलो | |
| ४५ | गोडेतेल | १ किलो | |

| (B) अल्पोपहार पदार्थ | | | |
|---|---|---|---|
| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
| १ | फरसाण ब्रंडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| २. | शेवचिवडा ब्रॅडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ३ | शाबुचिवडा ब्रंडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ४ | बटाटा चिवडा ब्रॅडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ५ | मक्का चिवडा ब्रॅडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ६ | बटाटा वेफर्स ब्रॅडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ७ | केळी वेफर्स ब्रॅडेड कंपनीचे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ८ | खारे शेंगदाणे ५०० ग्रॅम | १ पॅकेट | |
| ९ | चिरमूरे | १ किलो | |
| १० | भाजके चने - हरभरा | १ किलो | |
| ११ | उकडलेले अंडे | १ नग | |
| १२ | कच्चे अंडे | १ नग | |

| (C) बिस्किटे , दुग्धजन्य पदार्थ इतर | | | |
|---|---|---|---|
| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
| १. | पारले बिस्कीट लहान पुडा | १ नग | |
| २ | पारले क्रिम बिस्कीट लहान पुडा | १ नग | |
| ३ | २०-२० बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ४ | ५०-५० बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ५ | मारी गोल्ड बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ६ | गुडडे बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ७ | हॅपी-हॅपी बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ८ | मोनॅको बिस्किट लहान पुडा | १ नग | |
| ९ | इक्लेअर चॉकलेट | १ नग | |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR •

Scanned with CamScanner

| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
|---|---|---|---|
| १० | अल्फेनलेबी चॉकलेट | १ नग | |
| ११ | मॅंगोबाईट चॉकलेट | १ नग | |
| १२ | खारी | १ नग | |
| १३ | बटर | १ नग | |
| १४ | टोस्ट | १ नग | |
| १५ | मिनरल वॉटर बॉटल १ लि. | १ नग | |
| १६ | मॅंगो लस्सी | २०० मिली | |
| १७ | ताक | ५०० मिली | |
| १८ | दही | २०० मिली | |
| १९ | श्रीखंड ब्रॅडेड कंपनीचे | १ किलो | |
| २० | पावभाजी पाव | १ डझन | |
| २१ | कप केक | १ नग | |
| २२ | पनिर | १ किलो | |
| २३ | गोकूळ दुध म्हशीचे ५०० मिली. | १ नग | |

**(D) साबण व इतर वस्तू**

| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
|---|---|---|---|
| १ | व्हिल साबण | १ नग | |
| २ | रिन साबण | १ नग | |
| ३ | सर्फ एक्सल | १ नग | |
| ४ | लाईफबॉय साबन १०० ग्रॅम | १ नग | |
| ५ | लक्स साबन १०० ग्रॅम | १ नग | |
| ६ | डेटॉल साबन १०० ग्रॅम | १ नग | |
| ७ | मेडिमिक्स साबन | १ नग | |
| ८ | पियर्स साबन | १ नग | |
| ९ | मोना निळ | १ नग | |
| १० | क्लिनिक प्लस शॅम्पू लहान पाऊच | १ नग | |
| ११ | डव्ह शॅम्पू लहान पाऊच | १ नग | |
| १२ | पॉन्ड पावडर १०० ग्रॅम | १ नग | |
| १३ | व्हॅसलीन पेट्रो जेली २० ग्रॅम | १ नग | |
| १४ | विक्स वेपोरेब प्लास्टीक लहान डबी | १ नग | |
| १५ | झंडू बाम लहान प्लास्टीक डबी | १ नग | |
| १६ | कोलगेट | ५० ग्रॅम | |
| १७ | क्लोजप | ५० ग्रॅम | |
| १८ | कोलगेट ब्रश | १ नग | |
| १९ | जास्मीन तेल | १०० मिली | |
| २० | राणीपॉल | १ नग | |

SUPERINTENDENT SUB JAIL • KOLHAPUR •

Scanned with CamScanner

| (E) होजीअरी व इतर वस्तू | | | |
|---|---|---|---|
| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
| १ | अमोलमाचो बनियन ८० सी.मी. | १ नग | |
| २ | अमोलमाचो बनियन ८५ सी.मी. | १ नग | |
| ३ | अमोलमाचो बनियन ९५ सी.मी. | १ नग | |
| ४ | अमोलमाचो अंडरवेअर ८५ सी.मी. | १ नग | |
| ५ | अमोलमाचो अंडरवेअर ९५ सी.मी. | १ नग | |
| ६ | पॅरागॉन स्लिपर | १ जोडी | |
| ७ | प्लॅस्टीक बकेट २०लि. | १ नग | |
| ८ | प्लॅस्टीक बकेट ५ लि. | १ नग | |
| ९ | प्लॅस्टीक मग | १ नग | |

| (F) फळे | | | |
|---|---|---|---|
| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
| १ | केळी | १ डझन | |
| २ | मोसंबी | १ किलो | |
| ३ | संत्री | १ किलो | |
| ४ | द्राक्षे | १ किलो | |
| ५ | सफरचंद | १ किलो | |
| ६ | चिकू | १ किलो | |
| ७ | सिताफळ | १ किलो | |
| ८ | डाळिंब | १ किलो | |
| ९ | पपई | १ नग | |
| १० | कलिंगड | १ नग | |
| ११ | लिंबू | १ नग | |
| १२ | पेरु | १ किलो | |
| १३ | अननस | १ नग | |

| (G) पंतजली वस्तू | | | |
|---|---|---|---|
| अ.क. | वस्तूचे नाव | परिमाण | दर प्रति किलो / नग |
| १ | पंतजली मारी बिस्किट | १ नग | |
| २ | पंतजली मिल्क बिस्किट | १ नग | |
| ३ | पंतजली कोकनट बिस्किट | १ नग | |
| ४ | पंतजली मल्टिग्रेन बिस्किट | १ नग | |
| ५ | पंतजली दंतकांती टूथपेस्ट | १ नग | |

SUPERINTENDENT SUB JAIL KOLHAPUR

अधीक्षक
कोल्हापूर जिल्हा कारागृह(शहर)

Scanned with CamScanner